# कार्यालय नगर परिषद, वानाडोंगरी

## तह. - हिंगणा, जिल्हा – नागपूर

जा. क्र. न.प.वा./न.र.वि./नियमि./१०२८

दिनांक :-२२/०१/२०२१

प्रति,

श्री. प्रभाकर गणपत साखळे,
श्री. दिलीप गणपत साखळे.
रा. वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपूर

**विषय : महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम, २०२१ अन्वये अभिन्यास / ले-आउट ला नियमितीकरण करणे.**
मौजा वानाडोंगरी प.ह.न. ४६ येथील खसरा क्र. ३८ आराजी १.६२ हे.आर. अभिन्यासातील भूखंड क्र. १ ते ९५ आराजी १०४१०.५८ चौ.मी. निवासी प्रयोजनार्थ भूखंड नियमितीकरण करणेबाबत.

**संदर्भ : १) श्री. प्रभाकर गणपत साखळे व श्री. दिलीप गणपत साखळे रा. वानाडोंगरी, नागपूर यांचा अर्ज क्र. २६५४ दिनांक १२/०७/२०२१**
**२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, शुक्रवार १२ मार्च २०२१ / फाल्गुन २१ शके १९४२ अन्वये.**
**३) आदेश क्र. अंनबा/ १०२०/४८०/प्र.क्र. ७९/भाग -२/नवि-२०/ मुंबई – ३२ दिनांक १८/०५/२००१.**

आपले संदर्भित अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, वरील अनधिकृत अभिन्यासातील विषयांकित भूखंडाचे / अभिन्यासातील भूखंड क्र. १ ते ९५ निवासी प्रयोजनार्थ भूखंड नियमितीकरण करण्यासाठी खालील शर्ती व अटीची पूर्तता केल्यास व कोणाचाही आक्षेप नसल्यास निवासी प्रयोजनार्थ नियमित करण्याचा प्रस्ताव स्विकारण्यात आला असे समजावे.

१) संबंधित भूखंडाचे / अभिन्यासाचे नियमितीकरणाकरीता एकूण रु. **११,३६,०५८/-** देय राशी सोबत जोडलेल्या मागणीपत्राप्रमाणे देय दिनांकाचे आंत रोख रक्कम / धनादेश / डिमांड ड्राफ्टद्वारे नगरपरिषद वानाडोंगरीकडे जमा करावे.

२) सोबत जोडलेल्या मागणीपत्राप्रमाणे देय रक्कम, मागणीपत्र मिळाल्यापासून मागणीपत्रात दर्शविल्याप्रमाणे देय दिवसात जमा केल्यानंतर खालील बाबीची पूर्तता ह्यापूर्वी केली नसल्यास करावी.

१. भूखंडाचे मालकी हक्काबाबत प्रमाणित दस्तावेज,
२. मागणीपत्राप्रमाणे देय रक्कमेचा भरणा केल्याचा पुरावा,
३. अकृषिक आदेशाची प्रत, असल्यास,
४. स्थळ दर्शक नकाशे तयार करून त्यावर स्वाक्षरी करून चार प्रतीत सादर करावे.
५. रु. १००/- व ५००/- चे स्टंप पेपर.
६. रु. १००/- स्टंप पेपर वर संमतीपत्र.
७. विकासकामाचे अंदाजपत्रक.
८. विकास कामाचा आराखडा (Developement Plan)

३) प्रस्ताव पत्र/मागणीपत्रामध्ये दर्शविण्यात आलेल्या मुदतीत आपणाकडून प्रतिसाद न मिळाल्यास उक्त भूखंडाचा नियमितीकरणाचा प्रस्ताव रद्द करण्यात येईल. तसेच भूखंडावर बांधकाम असल्यास ते अनधिकृत ठरवून बांधकाम काढण्यात येईल व महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण ) (सुधारित) अधिनियम २०२१ अन्वये पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) सदर भूखंड / अभिन्यास किंवा त्यावरील बांधकामाबाबत काही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, ते न्यायालयातून बिनशर्त मागे घ्यावे लागेल.

५) नियमितीकरण करण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी जे निर्देश / बदल प्राप्त होतील ते आपणास बंधनकारक राहतील.

६) सदर भूखंडाचे वापरा मध्ये बदल झाल्यास त्याची रितसर परवानगी घ्यावी लागेल.

७) सदर नियमितीकरण झाल्यानंतर उप अधीक्षक, भूमि अभिलेख विभाग, हिंगणा कडून स्वतंत्र मोजणी करून घ्यावी लागेल. मोजणीनुसार फरकाची रक्कम भरून फेर आदेश प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

८) सदर नियमितीकरण झाल्यानंतर तहसील कार्यालयाकडून अकृषिक आदेश प्राप्त करून या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

सहपत्र :- मागणीपत्र

मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी.